यशवाडी मंदिर दुर्घटना : 'दर्शन सुरू ठेवण्याचा निर्णय कंत्राटदाराचा'; चौकशीनंतर कारवाईची मागणी



पान ४ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्षं -19, अंक-42 | छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 22 जून 2026 | किंमत 2 रुपये, पाने -4

# जालना-छत्रपती संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ भाजपच्या ताब्यात; सुहास शिरसाट यांचा दणदणीत विजय



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जालना-छत्रपती संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची प्रतिष्ठेची निवडणूक भाजपने जिंकत महायुतीचा गड कायम राखला आहे. महायुतीचे उमेदवार सुहास शिरसाट यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश लोखंडे यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत विजय संपादन केला. या विजयासह पूर्वी शिवसेनेकडे असलेली ही जागा भाजपने आपल्या ताब्यात घेतली आहे.

निवडणुकीच्या निकालानुसार, पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये सुहास शिरसाट यांना ४५४ मते मिळाली. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश लोखंडे यांना १३४ मते मिळाली. एम आयएमचे उमेदवार इसाक खान यांना ३५ मतांवर समाधान मानावे लागले.

**शिवसेनेची जागा भाजपकडे**

२०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत तत्कालीन शिवसेना-भाजप युतीचे उमेदवार अंबादास दानवे यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवला होता. त्यामुळे ही जागा शिवसेनेकडेच राहावी यासाठी स्थानिक नेत्यांनी प्रयत्न केले होते. मात्र अलीकडील महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजपने दोन्ही जिल्ह्यांत शिवसेनेपेक्षा अधिक संख्याबळ मिळवत आपली ताकद सिद्ध केली होती.

**स्थानिक स्वराज्य संस्थांतील संख्याबळाचा भाजपला फायदा**

जालना महापालिकेत भाजपने स्वबळावर सत्ता स्थापन करत महापौर, उपमहापौर आणि सभापती पदांवर वर्चस्व राखले. छत्रपती संभाजीनगरमध्येही भाजपने स्वबळावर निवडणूक लढवत महापौर आणि स्थायी समिती सभापती पदे आपल्या ताब्यात ठेवली होती. जिल्हा परिषदेतही भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला होता.

याच राजकीय ताकदीचा आधार घेत भाजपने स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारीवर दावा केला आणि अखेर विजयही मिळवला.

**अतुल सावे यांची रणनीती ठरली निर्णायक**

या निवडणुकीत भाजपचे मंत्री अतुल सावे यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातील संख्याबळ आणि संघटनात्मक ताकद यांचा दाखला देत भाजपने ही जागा आपल्या वाट्याला आणली. तसेच महायुतीतील समन्वय राखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विशेष लक्ष दिल्याची चर्चा आहे.

**महाविकास आघाडीसमोर संख्याबळाचे आव्हान**

महाविकास आघाडीकडून सुरुवातीला देवयानी डोणगावकर यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र माघारीच्या अंतिम दिवशी त्यांनी अर्ज मागे घेतल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महापालिकेतील गटनेते गणेश लोखंडे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली. मात्र पुरेसे संख्याबळ नसल्याने त्यांना १३४ मतांवर समाधान मानावे लागले.

**भाजपच्या आमदारांची संख्या चारवर**

विजयी उमेदवार सुहास शिरसाट हे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे निकटवर्तीय आणि कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विजयामुळे जिल्ह्यात भाजपच्या विधान परिषदेतील सदस्यांची संख्या वाढली असून पक्षाचे राजकीय वर्चस्व आणखी मजबूत झाले आहे. मतांच्या आकडेवारीवरून मोठ्या प्रमाणात क्रॉस व्होटिंग झाल्याचे चित्र दिसून आले नाही. त्यामुळे महायुतीतील एकजूट आणि भाजपचे संख्याबळ या विजयामागील प्रमुख कारणे मानली जात आहेत.

# गजानन महाराज मंदिर ट्रस्टचे सर्व विश्वस्त पदच्युत; १० वर्षांनंतर भास्कर पंडितराव रेघे यांना न्याय मिळाला

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील श्री गजानन महाराज (शेगाव) मंदिर विश्वस्त मंडळाच्या सर्व विश्वस्तांना पदावरून हटविण्याचे आदेश संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी दिले आहेत. विश्वस्तांच्या कारभाराविरोधात दाखल करण्यात आलेल्या अर्ज क्रमांक १५२/२०१५ ला मंजुरी देत हा निर्णय देण्यात आला असून ट्रस्टच्या व्यवस्थापनासाठी तात्पुरती प्रशासकीय व्यवस्था नियुक्त करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भास्कर पंडितराव रेघे यांनी संयुक्त धर्मादाय आयुक्तांच्या न्यायालयात ट्रस्टच्या विश्वस्तांविरोधात अर्ज दाखल केला होता. या अर्जावरील सुनावणीनंतर संयुक्त धर्मादाय आयुक्त आर. एस. पावसकर यांनी १५ मे २०२६ रोजी आदेश जारी करत सर्व विद्यमान विश्वस्तांना तत्काळ प्रभावाने पदच्युत करण्याचे निर्देश दिले.

आदेशानुसार, उप धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० च्या कलम ५०-अ(१) अंतर्गत ट्रस्टच्या योग्य व्यवस्थापनासाठी योजना तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कलम ४७ अंतर्गत नवीन विश्वस्तांच्या नियुक्तीसाठी १ जुलै २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करण्यास सांगितले आहे.

**ए. आर. गावली यांच्याकडे तात्पुरता कारभार**

नवीन विश्वस्तांची नियुक्ती होईपर्यंत किंवा पुढील आदेश होईपर्यंत अधीक्षक ए. आर. गावली यांची ट्रस्टच्या प्रशासकीय कारभारासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यावर ट्रस्टची मालमत्ता, निधी, अभिलेख आणि प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यात आली असून सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**संयुक्त धर्मादाय आयुक्तांचा महत्त्वपूर्ण आदेश**

आदेशानुसार, १५ हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कोणत्याही खर्चासाठी सहायक धर्मादाय आयुक्तांची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार आहे. तसेच ट्रस्टने दरमहा १० हजार रुपये सार्वजनिक प्रशासन निधीत जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**निधी वसुलीचेही निर्देश**

संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी ए. आर. गावली यांना ट्रस्टमधून कथितरीत्या दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या निधीची वसुली करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पैठण येथील सर्व्हे क्रमांक २८९ मधील २ हेक्टर ८० आर जमीन खरेदीसाठी वापरण्यात आलेल्या ट्रस्ट निधीचीही वसुली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय मंदिर परिसरात इतर कोणत्याही ट्रस्टच्या दानपेट्या ठेवू नयेत, असेही स्पष्ट निर्देश आदेशात नमूद करण्यात आले आहेत.

**नवीन विश्वस्तांवर मोठी जबाबदारी**

नवीन विश्वस्तांची नियुक्ती किंवा निवड झाल्यानंतर त्यांच्यावर निधी वसुलीची प्रक्रिया पूर्ण करणे, ट्रस्टच्या मालमत्तेचे संरक्षण करणे, तसेच धर्मादाय कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्याची जबाबदारी राहणार आहे. या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगरातील धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली असून, गजानन महाराज मंदिर ट्रस्टच्या भविष्यातील कारभाराकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बार कौन्सिलवर सलग पाचव्यांदा निवड व ७१ व्या वाढदिवसानिमित्त ॲड. वसंतराव साळुंके यांचा भव्य सत्कार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा कार्यकारिणीवर सलग पाच वेळा निवडून आल्याबद्दल तसेच ७१ व्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. वसंतराव डी. साळुंके यांचा अभिष्टचिंतन व सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संयोजन समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून ॲड. साळुंके यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अंकुशराव कदम उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी मा. बापू पवार होते. यावेळी विधी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून ॲड. साळुंके यांच्या कार्याचा गौरव केला.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ॲड. वसंतराव साळुंके यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत तब्बल १२ हजारांहून अधिक न्यायालयीन प्रकरणे यशस्वीपणे हाताळली आहेत. त्यांचा शांत, संयमी आणि अभ्यासू स्वभाव हा वकिली क्षेत्रातील तरुणांसाठी आदर्श आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक यशस्वी वकील घडले असून त्यांनी न्यायव्यवस्थेला सक्षम मनुष्यबळ दिले आहे.

यावेळी उपस्थितांनी ॲड. साळुंके यांच्या कार्यकर्तृत्वाचे भरभरून कौतुक करताना त्यांच्या जिद्दीचा आणि कार्यक्षमतेचा विशेष उल्लेख केला. वयाची ७१ वर्षे पूर्ण होत असतानाही त्यांच्यातील ऊर्जा आणि कामाप्रती असलेली निष्ठा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे वाढदिवसाच्या दिवशीही ॲड. साळुंके यांनी पहाटे लवकर उठून दोन न्यायालयीन प्रकरणांची तयारी पूर्ण केल्याची माहिती समोर येताच उपस्थितांमध्ये त्यांच्या कार्यतत्परतेबाबतई कौतुकाची चर्चा रंगली. 'या वयातही एवढी ऊर्जा आणि कामावरील प्रेम कुठून येते?' असा प्रश्न उपस्थितांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांनी ॲड. वसंतराव साळुंके यांना निरोगी, दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक व विधी क्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# प्रादेशिक पक्षांचं अस्तित्व धोक्यात

केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी झालेली धडपड त्यानंतर मिळालेला कौल असा प्रवास करत २०१४ पासून या पक्षाने केंद्रात आपला भरभक्कम जम बसवला. सध्या देशाच्या ७८ टक्के भूभागावर आमची सत्ता आहे, असा भाजपचा दावा आहे. महाराष्ट्रात 'उबाठा'त पडलेली फूट आणि त्याच वेळेला पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचं झालेलं पूर्ण विघटन यामुळे प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सत्तेचे भागीदार असेपर्यंत प्रादेशिक पक्षांचा संसार सुरळीत चालतो; पण सत्ता गमावताच हे प्रादेशिक पक्ष एखाद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतात. त्यामुळे, प्रादेशिक पक्षांची बांधणी, त्याला सत्तेचा असलेला गोंद आणि त्यांची काळाशी सुसंगतता या तीनही मुद्द्यांच्या आनुषंगाने गंभीर चर्चा करण्याची गरज भासू लागली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालं, तेव्हा काँग्रेस हा एकच एक मजबूत राष्ट्रीय पक्ष होता. त्या काँग्रेसच्या पोटात विविध प्रादेशिक गट, मध्यम आणि डाव्या विचारसरणीचे (किंचित उजवेही) गट होते. फाळणी आणि त्यानंतर म. गांधींची हत्या या दोन लागोपाठ घडलेल्या दुर्घटनांनी भारतीय लोकशाहीची नौका डळमळेल, असा अनेक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा अंदाज होता. पण, तो खोटा ठरला. तत्कालीन सर्व राजकीय पक्षांनी आपापसातील मतभेद कायम ठेवून, त्याबाबत जाहीर टीकाटिप्पणी करूनही या दोन्ही प्रसंगातून भारताचं स्वातंत्र्य आणि लोकशाही प्रक्रिया व्यवस्थित तारून नेली. भारतासारख्या प्रचंड विविधता आणि अंतर्विरोध असलेल्या देशात एकच एक पक्ष आणि त्याभोवती सर्व राजकारण फिरत राहणं अवघड होतं.

त्यामुळे साठच्या दशकातच विविध राजकीय पक्षांची ताकदीने उभारणी सुरू झाली आणि त्याद्वारे देशात मोठं राजकीय ध्रुवीकरण झालं. १९६२ च्या निवडणुकीपासूनच त्याच्या पाऊलखुणा दिसू लागल्या होत्या. ८०-९० च्या दशकात प्रादेशिक पक्षांनी चांगला जोर धरला आणि त्यांचं 'सिंडिकेट' काँग्रेसच्या सत्तेला थेट आव्हान देऊ लागलं. काँग्रेसची ताकद या आव्हानाने कमी होत असताना आणि दुसऱ्या समर्थ राष्ट्रीय पक्षाचा प्रभावी उदय तोपर्यंत झाला नसल्याने छोट्या प्रादेशिक पक्षांना आपापसातील समीकरणं बदलत केंद्र सरकारच्या घडण्या-बिघडण्यात मोठा वाटा उचलण्याची संधी मिळाली. त्यानंतर 'अयोध्ये'ची लाट आली; त्यात दुसऱ्या राष्ट्रीय पक्षाचा दमदार पर्याय उभा राहिला. सुरुवातीला केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी झालेली धडपड त्यानंतर मिळालेला कौल असा प्रवास करत २०१४ पासून या पक्षाने केंद्रात आपला भरभक्कम जम बसवला. सध्या देशाच्या ७८ टक्के भूभागावर आमची सत्ता आहे, असा भाजपचा दावा आहे.

भारतीय मतदाराने केंद्रात भारतीय जनता पक्षाला कौल दिला आणि लगेच राज्यांची सूत्रं त्यांच्या हाती दिली, असं झालं नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या प्रभावी नेत्याच्या हाती केंद्राची सूत्रं दिल्यानंतर या पक्षाने आपल्या सत्ताविस्ताराची सूत्रं गृहमंत्री अमित शहा यांच्या हाती सोपवली. सुरुवातीला प्रत्येक राज्यात तिथल्या प्रभावी प्रादेशिक पक्षाला हाताशी धरूनच भाजपला राज्याराज्यात सत्तेत पाय ठेवता आला. ओदिशात बिजू जनता दल, आंध्र प्रदेशात तेलुगू देसम पार्टी, पंजाबात शिरोमणी अकाली दल, काश्मीरमध्ये पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी, तामिळनाडूत अण्णा द्रविड कळघममध्ये, महाराष्ट्रात शिवसेना, बिहारमध्ये संयुक्त जनता दल, उत्तर प्रदेशात काही काळ बहुजन समाज पक्ष-अशी मोठी यादी आहे. केवळ दाखला म्हणून त्या त्या राज्याच्या प्रमुख पक्षांची नावं इथे घेतली आहेत. प्रत्यक्षात केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी आणि राज्यातील सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपने कितीतरी स्थानिक पक्षांशी जमवून घेतलं; आपल्या मित्र पक्षांची यादी विस्तारत नेली. संघराज्य असणाऱ्या भारतात सत्ता मिळवण्याचा आणि तिचा विस्तार करत जाण्याचा हाच व्यवहारी, जवळचा आणि सर्वोत्तम मार्ग होता. एकेकाळी काँग्रेसचे मित्र असलेल्या पक्षांना आकर्षित करण्यासाठी भाजपने आपल्या कठोर वैचारिक भूमिकेला मुरडही घातली. बिहार-उत्तर प्रदेशात 'बिगर काँग्रेसवादा'ने पछाडलेल्या समाजवादी नेत्यांना, त्यांच्या आदर्शांनाही स्थानिक प्रेरणास्थान म्हणून स्वीकारलं; त्यांचे गुणगान केलं आणि पुतळेही उभारले. भाजप पद्धतशीरपणे स्वतःच्या कक्षा अशा रुंदावत असताना नेमका काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा दुष्काळ पडला. काँग्रेस ज्या प्रादेशिक नेतृत्वाच्या खांद्यावर उभी होती, ते खांदे काँग्रेसकडून एकामागे एक काढून आपल्या खुर्चीसाठी टेकू म्हणून वापरण्याची नीती भाजपने अवलंबली. 'काँग्रेसमुक्त भारत' करण्याचा कार्यक्रम त्यांनी असा मोहीम म्हणून राबवला. त्यामुळे २०१४ नंतर पाच-सात वर्षांतच भाजप देशात बलाढ्य पक्ष म्हणून उभा राहिला. काँग्रेसने आपली बहुतेक भूमी याच काळात गमावली.

ज्या प्रादेशिक पक्षांची मदत भाजपने घेतली, ते पक्ष आज कुठे आहेत? असा प्रश्न भाजपचे विरोधक नेहमी विचारतात. त्याचं पहिलं उत्तर 'ते सर्व भाजप बरोबरच आहेत' हेच येतं. फक्त त्यांच्या राजकीय बलाबलात आता फरक झाला आहे. म्हणजे, जिथे कधीकाळी भाजपने त्यांचा आधार घेतला होता, तिथे आज ते भाजपच्या आधाराने उभे आहेत किंवा सत्तेत आहेत! याला कारण जागतिक परिस्थिती आणि त्या आनुषंगाने बदललेलं देशांतर्गत राजकारण. गेलं तप हे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिरतेचं, युद्धाचं, संघर्षाचं तप होतं. पाकिस्तानला वठणीवर आणणं ही देशाची गरज होती. कोरोनासारखी जागतिक महामारी याच काळात आली. भारताने आपल्या करारचनेत आमूलाग्र सुधारणा याच काळात केल्या. कर संकलन केंद्रात एकवटलं. राज्यांचे कर आकारणीचे अधिकार जवळजवळ संपले. ते फक्त केंद्राच्या कर उत्पन्नातले वाटेकरी झाले. मोदी यांनी देशातील जनतेशी हिंदीतून उत्तम संवाद ठेवलाच; शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची प्रतिमा 'विश्वगुरू' अशी झाली. या सगळ्या धोरणात साहजिकपणे राज्यातील नेतृत्व खुजी दिसू लागली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मुद्द्यांमध्ये जनमत अडकत गेलं. प्रादेशिक पक्षांनी, त्यांच्या नेत्यांनी या याचा विचार केल्याचं कुठे दिसलं नाही. राजकीय अजेंडा बदलला, राजकारणाचा आवाकाही बदलला. भाजपने जिंकलेल्या या राजकीय पर्यावरणाने प्रादेशिक पक्ष, नेते निष्प्रभ होत गेले. यापुढेही होत जातील. काँग्रेसच्या आधाराने त्यांचं अस्तित्व किती टिकेल? हा या पुढचा प्रश्न आहे.

# विश्वः तुमचं..आणि आभासी युग!

**आपण** तंत्रज्ञानाने विकासाचा नवा टप्पा गाठतोय ही अतिशय समाधानाची नव्हे तर आनंदाची बाब आहे. मात्र या साऱ्या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा देखील आहे. जसे नाण्याला दोन बाजू असतात तसच याबाबतीत देखील आहे. आलेला कृत्रिम बुद्धीमता आणि इतर समाज माध्यमांनी नवा बदल आणला आहे. समाज माध्यमे जशी प्रगत झाली तसे त्याचे धोके देखील आता दिसत आहेत. यात सर्वात मोठा धोका हा मानसिक आरोग्याला आहे.

आरोग्याचा आपण विचार करतो त्यावेळी आपणास शारिरीक आरोग्या सोबतच मानसिक आरोग्याचा देखील विचार करणे आवश्यक असते आणि नेमकेपणाने आपणास याचा विसर पडलेला दिसतो.

घरात चार जणांचे कुटुंब ही शहरीकरणातून नव्याने आलेली समस्या आहे. त्यातही काही कुटुंबात ३ जणच आहेत. अशीही स्थिती आहे. पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी घरातला काळ हा संवादाचा काळ होता. त्यावेळी रेडिओ शिवाय मनोरंजनाचे दुसरे साधन नव्हते. नंतर टिव्हीचा शिरकाव झाला मग २४ तास वाहिन्यांनी मनोरंजनाचा रतिब सुरु केला. आज देशातील विविध भाषक टीव्ही वाहिन्यांची संख्या ११७१ इतकी आहे. मनोरंजनासाठी वाहिन्या कमी पडताहेत आणि आपण तयार केलेल्या कलाकृतींना व्यासपीठ मिळत नाही. या भुमिकेतून ओव्हर द टॉप अर्थात जढढ चा प्रसार वेगात झाला. हे सर्व घडत असताना इंटरनेटचा प्रसार वाढला. ज्याला माहिती तंत्रज्ञानाचे युग आपण म्हणतो तसं युग अवतरले. यात फेसबूक, एक्स तसेच इन्ट्राग्राम सारख्या संवाद माध्यमांसोबत दुहेरी संवाद, चित्र संवाद आणि संदेश वहन सुरु झाल. यात 'व्हॉटसअप' ने प्रत्येक हातातला मोबाईलने मानसिक शांततेला पहिला धक्का दिला.

यानंतर आलेल्या 'रिल्स' ने एक क्रांती घडवली व सोबत नव्या पिढीची मानसिक शांतता पूर्णपणे संपवली. त्यातच जुन्या पिढीला आता या रिल्सचं 'व्यसन' जडलय की काय असं आता वाटायला लागले आहे. एका घरातील ४ माणसं ४ मोबाईल आणि ४ स्वतंत्र विश्व एकाच छताखाली अशी स्थिती आली आहे.

या रिल्सच्या प्रभावाने मोठ्या प्रमाणावर नवी पिढी दोन प्रकारे स्वतःचं नुकसान करून घेताना दिसते. 'रिल्स' च्या नादात होणारे अपघाती मृत्यू हा स्वतंत्र असा विषय आहे. मात्र आपल्या उपस्थितीची दखल घेणं आपल्या कामाला दाद मिळणं या अपेक्षा वाढलेला नव्या पिढीत नैराश्य वाढत आहे आणि ही धोक्याची घंटा आहे.

हातात मोबाईल घेऊन रस्ता ओलांडणारे अनेक जण दुर्दैवाने अपघाती मृत्यूत प्राण गमावून बसले आहेत. या माध्यमाच्या वेडापायी स्वतःची तहान-भूक हरपून झोपही विसरणारे नकळत स्वतःच्या आरोग्यावर परिणाम करून घेत आहेत

२०१३ साली मी या विषयावर प्रथम लिहिलं, त्यावेळी म्हटल होत की, आठवड्यातून किमान एक 'मोबाईल हॉलीडे' सर्वांनी पाळावा. आता तर स्थिती अशी आली आहे की 'गॅझेट फ्री' अवर्स (तास) दिवसात किती असावेत हे ठरवावं लागणार आहे. टीव्ही, मोबाईत हे सारं मिळून आपला 'स्क्रीन टाईम' किती मर्यादीत ठेवायचा याचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

मोबाईल हे संदेशवहन आणि केवळ संदेशवहन इतके मर्यादीत राहिलेलं नाही. मात्र आजही अमेरिकेसारख्या महासत्ता असणाऱ्या देशात 'पेजर' चा वापर अधिक केला जातो हे देखील आपण जाणून घेतलं पाहिजे. 'मोबाईल माझ्यासाठी कि मी मोबाईलसाठी' हे ठरवावं लागणार आहे.

मोबाईलमधील कॉन्टेन्ट बघताना आपल्या मानसिक स्थितीत नेमकेपणाने काय बदल होतात याचा विचार होत नाही. 'न्यूरोसायन्स' च्या अभ्यासातून समोर आलं आहे की, आपल्या मेंदूत कृत्रिम लहरीतून आनंदाची अनुभूती देणारे 'डोपामाइन' असेल तर आपल्याला त्यात अधिक रस असतो, पण कृत्रिम डोपामाईन निर्मिती ही क्षणिक असते. काही झालं तरी ते पूर्णपणे आभासी विश्व आहे.

घरात कुटुंबासोबत होणारा अंवाद, मित्र-मैत्रीणीसोबत चर्चा करणे तसेच, प्रसंगी वाद-विवाद, आपल्या आसपासच्या निसर्गाचं आणि खऱ्या जगाचं भानं असणं म्हणजे खरा आनंद आहे. 'रिल्स' बघताना सोशल मीडिया साईटसब नकळत आपल्या आवडीचा वेध घेऊन त्याच पद्धतीच्या रिल्स सातत्याने आपणास दिसतील असे 'अल्गोरिदम' विकसित करून आपल्या मनाचा नकळत ताबा घेत आहे.

वय झाल म्हणून सांगत नाही पण रेडिओवर पुढचं गाणं कोणतं असेल याची अनिश्चितता आणि अपेक्षा व त्यातील आनंद वेगळा होता. १५ पैशांचं ख्यालीखुशाली कळवणारं 'टपाल' पोस्टकार्ड जितका आनंद देत असे तितका आनंद या आभासी जगात निश्चित नाही. या स्वागत आहे खऱ्या विश्वात... सोडा ते आभासी...

**श्री.प्रशांत दैठणकर**
प्रभारी उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# अरबी समुद्रात चक्राकार वारे, राज्यात मान्सूनच्या प्रवासाला वेग; १ जुलैपासून मान्सून पूर्ण सक्रिय होणार

मुंबई : महाराष्ट्रात जून महिन्याच्या सुरुवातीला दाखल झालेला मान्सून गेल्या काही दिवसांपासून रखडल्यामुळे राज्यात चिंतेचे वातावरण आहे. ६ जून रोजी तळकोकणात आगमन झाल्यानंतर ८ जूनपासून मान्सून दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे एकाच जागी स्थिर आहे. अनुकूल हवामान प्रणाली अभावी मान्सूनचा प्रवास मंदावला असून राज्यात जून महिन्याच्या सरासरीच्या केवळ २२ टक्के पावसाची नोंद झाली आहे. परिणामी, राज्यात तब्बल ७८ टक्के पावसाची मोठी तूट निर्माण झाली असून शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे. मात्र, आता हवामान विभागाने दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे.

बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात मान्सूनच्या पुढील वाटचालीला गती देणारी हवामान प्रणाली सक्रिय होत आहे. २३-२४ जूनपासून परिस्थिती अनुकूल होऊन २५ जूननंतर पावसाचा जोर वाढेल आणि १ जुलैपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, रविवारी सकाळपासून मुंबईसह उपनगराच्या काही भागांत पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरातील पूर्वेकडील व ईशान्येकडील वारे आणि अरबी समुद्रातील उत्तरेकडील वाऱ्यांमधील तफावत, गुजरात ते ओडिशा दरम्यान

निर्माण झालेला उच्च दाबाचा पट्टा, तसेच हिमालयाच्या पश्चिम भागातील चक्रवाताचा प्रभाव यामुळे मॉन्सूनची प्रगती मंदावली आहे.

याशिवाय, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात 'एल निनो' सक्रिय झाला असून जून ते सप्टेंबर या मान्सून हंगामात त्याची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. महासागर आणि वातावरणातील ही स्थिती भारतीय मॉन्सूनसाठी प्रतिकूल मानली जात असल्याने, यंदाच्या हंगामात पावसाचे असमान वितरण आणि काही भागांत पावसाची कमतरता राहू शकते. २५ जूननंतर हवामानात बदल २५ जून ते १ जुलै या कालावधीत सोमालिया किनारपट्टीकडून भारताच्या दिशेने बाष्प घेऊन येणारे वारे मजबूत होणार आहेत. मध्य अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण होणार असल्याने मध्य आणि दक्षिण भारतात पश्चिमेकडील वाऱ्यांचा प्रभाव वाढेल. यामुळे कोकण किनारपट्टीसह राज्यातील बहुतांश भागात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. 'यलो अलर्ट' (वादळी पाऊस): सोलापूर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट भागात आज वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. हलक्या सरींचा अंदाजः मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे आणि पुणे घाट, सातारा आणि सातारा घाट, सांगली, धाराशिव, लातूर आणि नांदेड. विदर्भाची स्थिती: विदर्भातील बहुतांश भागात आज उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती राहण्याचा अंदाज असून, काही भागांत वादळी पावसाचीही शक्यता आहे. पावसाची सद्यस्थिती धुळे, नंदूरबार आणि ठाणे: १००% तूट धाराशिव: ३८% तूट सांगली: ४९% तूट सोलापूर: ४७% तूट लातूर: ४१% तूट. बीड आणि चंद्रपूर: ५४% तूट नागपूर: ५१% तूट. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत ६० ते ९९ टक्के कमी पाऊस झाला आहे.

# छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरून उत्तर प्रदेशातील युवक बेपत्ता; रेल्वे पोलिसांकडून शोधमोहीम सुरू

छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरून उत्तर प्रदेशातील ३५ वर्षीय युवक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी मिसिंग क्रमांक ०५/२०२६ नोंदवत विविध रेल्वे व शहर पोलिस ठाण्यांना तपास यादी पाठवून युवकाचा शोध सुरू केला आहे.

रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनिलकुमार भागीरथ श्रीवास (वय ३५) हे मूळचे उत्तर प्रदेशातील शाशी जिल्ह्यातील बंगरा गावचे रहिवासी आहेत. ते कामाच्या शोधात छत्रपती संभाजीनगर येथे आले होते. त्यांची पत्नी नीलू सुनिलकुमार श्रीवास यांनी रेल्वे पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, सुनिलकुमार यांना ७ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ११.४५ वाजता सचखंड एक्स्प्रेस रेल्वेत बसवून छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरून उत्तर प्रदेशाकडे रवाना करण्यात आले होते. मात्र अपेक्षित दिवशी ते घरी पोहोचले नाहीत. त्यानंतर कुटुंबीयांनी नातेवाईक आणि परिचितांकडे चौकशी केली, परंतु त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही.

रेल्वे पोलिसांनी जारी केलेल्या माहितीनुसार, बेपत्ता युवकाची उंची सुमारे ५ फूट ६ इंच , रंग सावळा, बांधा मजबूत, चेहरा उभा असून डोक्यावरील केस काळे व दाट आहेत. त्यांनी पांढऱ्या रंगाचा शर्ट



आणि काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केली होती. ते हिंदी भाषा बोलतात. त्यांच्या उजव्या हातावर नाव गोंदलेले असून दाढी काळ्या रंगाची असल्याचे वर्णन देण्यात आले आहे.

याप्रकरणी रेल्वे पोलिस ठाणे, छत्रपती संभाजीनगरचे एचसी ३६७ भाऊसाहेब खिल्लारे तपास करीत आहेत. संबंधित व्यक्तीबाबत कोणाला माहिती मिळाल्यास रेल्वे पोलिसांशी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रेल्वे पोलिसांनी नांदेड, परळी, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी तसेच शहरातील विविध पोलिस ठाण्यांना तपास यादी पाठवून शोधकार्य अधिक तीव्र केले आहे. युवकाचा शोध लागावा यासाठी सर्व यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत.

# वादळी वाऱ्याने झाडाची फांदी कोसळून सोलर पंपाचे मोठे नुकसान

छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)

जिल्हातील वैजापूर तालुक्यात नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाचा फटका भगूर येथील शशांक तुळशीराम चव्हाण या शेतकऱ्याला बसला. वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे शेतातील झाडाची फांदी सोलर पंपाच्या पॅनेलवर कोसळून पॅनेलचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे संपूर्ण सौर पंप प्रणाली बंद पडली असून उभ्या पिकांच्या सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

चव्हाण यांच्या गट क्रमांक ७८/२ मधील शेतात सौरऊर्जे वर चालणाऱ्या पंपाद्वारे पिकांना पाणीपुरवठा केला जात होता. मागील काही दिवसांपूर्वी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतातील झाडाची फांदी थेट सोलर पॅनेलवर कोसळली. यामुळे पॅनेलची संपूर्ण यंत्रणा निकामी झाली आहे. परिणामी सिंचन व्यवस्था ठप्प झाल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सोलर पंपाच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने चव्हाण यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे या घटनेचा महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामा करून शासनाच्या आपत्ती मदत अथवा संबंधित योजनेंतर्गत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी चव्हाण यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.



# महिला शेतकऱ्यांना हक्क व सन्मान मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई (अतुल मत प्रतिनिधी)

महिला शेतकऱ्यांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून यासंदर्भातील विधेयक अधिवेशनात मांडण्यात येणार आहे, त्यामुळे पावसाळी अधिवेशन सकारात्मक वातावरणात पार पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. यंदाचे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून जाहीर केले असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या.



अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात येत असलेला चहापान कार्यक्रम केवळ औपचारिक कार्यक्रम नसून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमधील संवादाचे प्रभावी माध्यम आहे. लोकशाहीमध्ये संवादाला महत्व असून संवादातूनच प्रश्न सुटतात, यावर आपला विश्वास आहे असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या.

विधिमंडळ हे जनतेच्या अपेक्षा, प्रश्न आणि आकांक्षा मांडण्याचे सर्वोच्च व्यासपीठ असून, अधिवेशनात जनहिताचे विषय, विकासकामे आणि राज्याच्या प्रगतीशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.

जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करून मार्ग काढण्याची शासनाची भूमिका असून राज्याच्या विकासासाठी पावसाळी अधिवेशनामध्ये शेतकरी, कामगार, महिला, युवक, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विषयांवर सरकार सकारात्मक भूमिका मांडेल, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

# योग हे समाजाला जोडण्याचे माध्यम

मुंबई (अतुल मत प्रतिनिधी)

योगचा अर्थ 'जोडणे' असा होतो. मन, शरीर आणि आत्मा, या सर्वांचे एकमेकांशी जुळणे तेव्हाच आपल्यामध्ये एक प्रकारचे पूर्णत्व, आनंद आणि सुदृढता या तिन्ही गोष्टी येतात आणि आपण आपल्या आयुष्यात जे काही ध्येय ठरवतो ते साध्य करतो. योग हे समाजाला जोडण्याचे माध्यम बनत असल्याचे मत केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्रीमती अनुप्रिया पटेल यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त वरळी डोमच्या सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे रविवारी (२१ जून २०२६) योग सत्राचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी त्या बोलत होत्या. या विशेष सत्रात त्यांच्यासह कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती आश्विनी भिडे, दिव्याज फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, अभिनेता शाहिद कपूर, अभिनेत्री श्रीलीला, शांतीलाल मुथा,डॉ. निवेदिता श्रेयांश पिळे, मेघाश्रय संस्थाच्या संस्थापिका सीमा सिंग आदी मान्यवरांनी योग प्रात्यक्षिक केले. योग सत्रात मान्यवरांसह बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विद्यार्थी व दिव्यांग शेतकऱ्यांची मुले सहभागी झाले होते.

याप्रसंगी बोलतांना रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, 'योगच्या माध्यमातून जगाला एक वेगळी दिशा दिली आहे. भारताने शेकडो वर्षांपासून जगाला बरेच काही दिले आहे, पण अलीकडच्या काळात जग भारताला प्रामुख्याने योगसाठी ओळखते. योग दिनाच्या निमित्ताने आपण सर्व मिळून 'विकसित भारत संकल्पनेला पुढे नेऊ.'

मुंबई महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी सांगितले, 'गेली अनेक वर्षे योग दिनाच्या निमित्ताने मुलांना बोलावून त्यांना योगचे शिक्षण देण्याचे कार्य दिव्याज संस्था सातत्याने करत आहे. आणि ते आजही सुरू आहे. यानिमित्ताने मुलांना लहान वयापासूनच योगचे महत्व कळत आहे. दिव्याज फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस म्हणाल्या, 'आजपासून आपण सर्व रोज योग करण्याची प्रतिज्ञा घेऊ. मी रोज योग करणार, एकही दिवस सुट्टी नाही घेणार, असा दृढ निश्चय करूया. रोज स्वतःच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी योग गरजेचा आहे.' या विशेष सत्रात सहभागी योग प्रशिक्षकांनी योग आसनांची प्रात्यक्षिके करुन त्यांचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. विद्यार्थ्यांनी विविध आसनांची प्रात्यक्षिके केली.

# पंढरपूर मंदिरातील लेपन प्रक्रियेवरील स्थगिती अर्ज न्यायालयाने नाकारला

सोलापूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींवर भारतीय पुरातत्त्व विभागाच्या सल्ल्यानुसार करण्यात येणाऱ्या लेपन प्रक्रियेला स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी याचिका जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावली आहे. ही याचिका भीमाचार्य बाळाचार्य वरखेडकर यांनी दाखल केली होती.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने स्थगिती अर्ज नामंजूर केला. दरम्यान, मंदिर महासंघाचे गणेश लंके यांनी दाखल केलेल्या स्वतंत्र अर्जावर रविवारी (२२ जून) न्यायालय निर्णय देणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. मंदिर समितीनुसार स्वयंभू विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींची झीज होत असल्याने त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचा सल्ला भारतीय पुरातत्त्व विभागाने दिला आहे. त्यानुसार २२ ते २४ जून या कालावधीत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली मूर्तींवर लेपन प्रक्रिया करण्यात येणार आहे. या कामासाठी २२ आणि २३ जून या दोन दिवसांत मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार असून, संवर्धन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमित दर्शन व्यवस्था पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

# आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान, लाईफ फिटनेस जिमतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## डॉ. दिव्या पाटील यांचे लाभले योगाच्या महत्त्वावर मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)

आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान व लाईफ फिटनेस जिम यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २०) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच नागरिकांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात डॉ. दिव्या पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यामागील उद्देश आणि योगाचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांना एकत्र जोडणारी जीवनशैली असल्याचे त्यांनी सांगितले. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात योग अत्यंत आवश्यक असून नियमित योगाभ्यास केल्याने मानसिक शांतता, एकाग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती प्राप्त होते, असे त्यांनी नमूद केले. तसेच अनेक आजारांपासून दूर राहण्यासाठी योग हे प्रभावी साधन असल्याचे स्पष्ट करत प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

यानंतर सोनाली बोरसे यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी उत्साहाने योगाभ्यास करत कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमातून योग करा, निरोगी रहा हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहभागी, पदाधिकारी तसेच उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# कोल्हापुरात नवीन उद्योगांना बळ

मुंबई : कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मौजे टाकळी येथील एकूण ४७.६३ हेक्टर शासकीय व गायरान जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान करण्यास मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार, मौजे टाकळी (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) येथील गट क्रमांक १३५० मधील १२.८६ हेक्टर गायरान जमीन, १५.०० हेक्टर शासकीय जमीन तसेच गट क्रमांक ११९४ मधील १९.७७ हेक्टर गायरान जमीन अशी एकूण ४७.६३ हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देण्यात येणार आहे. जमीन औद्योगिक प्रकल्प उभारण्यासाठी वापरण्यात येणार असून, या जमिनीचे कृषिक दराने प्रचलित बाजारमूल्यानुसार मूल्य निश्चित करून त्याची संपूर्ण रक्कम एमआयडीसीकडून वसूल करण्यात येणार आहे. ही जमीन एमआयडीसीला भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने आणि कब्जेहक्काने प्रदान करण्यात येणार आहे.

याविषयी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात औद्योगिक विकासाला गती देण्याचे काम सुरू आहे. कोल्हापूरसारख्या प्रगत जिल्ह्यात उद्योगवाढीसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. या निर्णयामुळे शिरोळ परिसरात औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळेल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. राज्यातील औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या जमीन उपलब्धतेच्या प्रक्रियेला शासन अधिक गतिमान करत आहे.'

# राममंदिर देणगी चोरी प्रकरणी लवकरच एफआयआर दाखल?:टिन्नू यादवसह ८० जणांवर गुन्हा दाखल होणार

राम मंदिरातून देणगी चोरीच्या प्रकरणाची चौकशी करणारे विशेष तपास पथक आज मुख्यमंत्री योगी यांना प्राथमिक अहवाल सादर करू शकते. रविवारी संध्याकाळी पथक योगींना भेटण्यासाठी पोहोचले होते. परंतु, भेट होऊ शकली नाही. मुख्यमंत्री आधीच नियोजित असलेल्या पावसाळी अधिवेशनासह इतर बैठकांमध्ये व्यस्त होते.

एसआयटीने ७ पेन ड्राइव्हमध्ये डेटा सुरक्षित केला आहे. ६ दिवसांच्या चौकशीत १५० संशयितांची नावे समोर आली आहेत. यापैकी २५ लोकांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. ज्या लोकांची एसआयटीने चौकशी केली आहे, त्यांना पुढील आदेश मिळेपर्यंत बाहेर न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांचाही समावेश आहे.

एसआयटी या प्रकरणात आज-उद्या एफआयआर (ऋखठ) देखील दाखल करू शकते. चंपत राय यांचे जवळचे राम शंकर यादव उर्फ टिन्नू आणि अनुकल्प यांच्यासह ८० लोकांना नामनिर्देशित केले जाऊ शकते. यामध्ये ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांची नावेही सांगितली जात आहेत. टिन्नू हा चंपत राय यांचा जवळचा आहे. तो देणगीच्या रकमेची मोजणी संबंधित कामे पाहत होता. त्याच्यावर ८ महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज डिलीट केल्याचा आरोप आहे. तर, अनुकल्प मिश्रा देखील राम मंदिरात नोकरी करतो.

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस शनिवार दि.२० जून पासुन सुरुवात होणार आहे. गणना अर्जाची छपाई व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आटोपल्यावर येत्या ३० जून पासून मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पुर्वीच्या नोंदीशी जुळवणी केली जाईल. प्रारुप मतदार याद्या दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक निर्दोष करण्यासाठी राबविली जात आहे. लोकशाही बळकट करणाऱ्या निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी व मतदारांच्या मताच्या हक्काचे संरक्षण होण्यासाठी पुनरिक्षण आवश्यक आहे. जाणून घेऊ या पुनरिक्षण प्रक्रियेविषयी–

**विशेष सखोल पुनरिक्षणाचा इतिहास**

भारत निवडणूक आयोगामार्फत संपूर्ण देशात मतदार याद्यांचे सखोल पुनरिक्षण करण्यात येत आहे.याबाबत दि.२४ जून २०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यापूर्वी देशात सन १९५२-५६, १९५७, १९६१, १९६५-१९६६, १९८३-८४, १९८७-८८, १९९२, १९९५, २००२-२००४ या वर्षी विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आले आहे.

**१६ राज्यांत मोहीम**

या मोहिमेचा तिसरा टप्पा १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशात राबविण्यात येत आहे. संविधानाच्या कलम ३२६ प्रमाणे मतदार यादीत मतदाराचे नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती ही भारताचा नागरिक असणे आणि वयाची १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे.

**पुनरिक्षण मोहिमेचे वेळापत्रक**

दि.२० ते २९ जून दरम्यान गणना अर्जाची छपाई व बीएलओ यांचे प्रशिक्षण, दि.३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करुन ते भरुन अर्ज परत घेतील. दि.५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी, दि.५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदविणे, ३ ऑक्टोंबर पर्यंत दावे व हरकती निकाली काढणे, दि.७ ऑक्टोंबर रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी.

**काय होणार पुनरिक्षण प्रक्रियेत?**

दि.३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी हे मतदारांच्या घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करतील. त्यात मतदारांची मतदार यादीतील सध्याची माहिती आधीच भरलेली असेल. तसेच सन २००२-२००४ मध्ये झालेल्या सखोल पुनरिक्षणातील माहिती (आई वडील/ आजी आजोबा यांची) भरलेली असेल किंवा मतदार स्वतः ही भरु शकेल. तसेच मतदारांना आपले नवीन छायाचित्रही उपलब्ध करुन देता येईल. सद्यस्थितीत या जुन्या नोंदीची जुळवणी सद्याच्या मतदारांशी केली जाईल. ही कारवाई मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. घरोघरी गेल्यावर गणना प्रपत्रात जुनी माहिती भरणे सहज शक्य व्हावे म्हणून ही पुर्वतयार करण्यात आली आहे. आता पर्यंत ७६.६० टक्के ही प्रक्रिया (मॅपिंग) पूर्ण झाली आहे.

**ऑनलाईन पर्यायही उपलब्ध**

आपल्या आई-वडील/ आजी आजोबा यांच्या सन २००२-०४ या कालावधीतील नोंदीची माहिती भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर सहज उपलब्ध होईल. त्यासाठी केवळ मतदाराने आपले राज्य, जिल्हा, विधानसभा मतदार संघ व संपूर्ण नाव इतकी प्राथमिक माहिती भरली तरी जुन्या नोंदी सहज उपलब्ध होतील. ही मतदाराने आपल्याकडे जतन करुन ठेवावी व आपल्या घरी आलेल्या गणना कर्मचाऱ्याला उपलब्ध करुन द्यावी. घरोघरी भेटी दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या घरी किमान ३ वेळा येईल व भेट दिल्याची नोंद ठेवेल. पुन्हा गणना पत्र गोळा करण्यासाठी हे अधिकारी भेट देतील. याशिवाय मतदार हे गणना पत्र ऑनलाईनही भरु शकतील.

**प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी** – प्रारुप मतदार यादी दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होईल. ज्या मतदारांची नावे पुर्वीच्या यादीशी जुळवणी झाले नसतील वा त्यात काही त्रुटी असतील अशा व्यक्तिंना नोटीस पाठवून कळिवले जाईल. तसेच या याद्या नावे समाविष्ट न झाल्याच्या कारणासह संबंधित मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, तहसिल कार्यालय, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर इ. ठिकाणी प्रसिद्ध करणात येतील. त्यावर हरकतीही नागरिकांना घेता येतील अशी तरतूद आहे.

**राजकीय पक्षांचाही सहभाग** – या प्रक्रियेत राजकीय पक्षांनाही सहभागी केले जाणार असून त्यांनीही आपले मतदान केंद्र प्रतिनिधी नेमावे, जेणे करुन ही प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक होण्यास मदत होईल.

**जिल्ह्याची सद्यस्थिती** –जिल्ह्यात एकूण मतदार ३२ लाख १७ हजार २३६ इतके असून आतापर्यंत २४ लाख ६४ हजार ५३१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. या गणनेसाठी ३२६४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी ३२७ सुपरवायझर नेमण्यात आले आहेत. याशिवाय ९ ईआरओ, ३३ एईआरओ नियुक्त करण्यात आले आहे.

प्रत्येक सहायक निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या शिवाय १९५० या हेल्पलाईन क्रमांकावरही नागरिकांना माहिती उपलब्ध होईल. या शिवाय 'बुक अ कॉल', ही सुविधाही ECINET या मोबाईल ॲपवर उपलब्ध असेल.

–माहिती संकलनः जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# यशवाडी मंदिर दुर्घटना : 'दर्शन सुरू ठेवण्याचा निर्णय कंत्राटदाराचा'; चौकशीनंतर कारवाईची मागणी



**परभणी (अट्टल मत प्रतिनिधी)**

मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध मंदिराच्या गाभाऱ्याचे छत कोसळून पाच भाविकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेनंतर मंदिर संस्थानचे अध्यक्ष शिवेंद्र स्वामी यांनी कंत्राटदारावर गंभीर आरोप केले आहेत. मंदिराच्या बांधकामादरम्यान दर्शन बंद ठेवण्याबाबत चर्चा झाली होती, मात्र राजस्थानच्या कंत्राटदाराने दर्शन सुरू ठेवण्यास हरकत नसल्याचे सांगितल्याने ही दुर्घटना घडल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

२० जून रोजी घडलेल्या या दुर्घटनेत पाच भाविकांचा मृत्यू झाला असून १८ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी एका भाविकाची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नांदेड येथे हलविण्यात आले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे. घटनेनंतर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून मंदिर तीन दिवसांसाठी दर्शनार्थ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**पाच वर्षांपूर्वी देण्यात आले होते बांधकामाचे कंत्राट**– मंदिराच्या बांधकामासाठी सुमारे पाच वर्षांपूर्वी भाविकांकडून वर्गणी गोळा करून राजस्थानमधील कंत्राटदाराला काम देण्यात आले होते. कोरोनाच्या काळात काम काही काळ थांबले होते. त्याचबरोबर अयोध्येतील श्रीराम मंदिरासाठी मोठ्या प्रमाणावर दगडी शिळांची मागणी वाढल्याने आवश्यक साहित्याची कमतरता निर्माण झाली होती. त्यामुळे मंदिराच्या बांधकामाची गती मंदावली होती. मात्र गेल्या दीड वर्षांपासून काम पुन्हा वेगाने सुरू करण्यात आले होते.

**स्ट्रक्चरल ऑडिटसाठी तज्ज्ञ पथके दाखल**– दुर्घटनेनंतर रविवारी पुरातत्त्व विभाग आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मंदिराच्या रचनेची सुरक्षितता तपासण्यासाठी पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ पथकांना पाचारण करण्यात आले आहे. या पथकांकडून मंदिराचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार असून त्याच्या अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार आहे.

प्रशासनाने मंदिर परिसराभोवती तारेचे कुंपण उभारले असून कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी १० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**१.०७ कोटी रुपयांचे कंत्राट; चौकशीनंतर गुन्हे दाखल होण्याची शक्यता**– मंदिराच्या बांधकामासाठी सुमारे १ कोटी ७ लाख ६ हजार रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते. त्यापैकी २१ लाख रुपयांची रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरित रक्कम कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने देण्यात येणार होती. राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळत असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, प्रशासनाने दुर्घटनेची सखोल चौकशी सुरू केली असून अहवाल आल्यानंतर निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असे संकेत अधिकाऱ्यांनी दिले आहेत. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत भाविकांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# रोजगार मेळाव्यातून तरुणांना मिळाला रोजगार; २०७ उमेदवारांची निवड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सुचना प्रौद्योगीकी संस्थान (छखएङखढ) यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जून २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील पंडीत दीनदयाल उपाध्याय छखएङखढ केंद्र येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यातून २०७ उमेदवारांची विविध नामांकित कंपन्यांसाठी प्राथमिक निवड करण्यात आली.

मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा कार्यालयाचे सहायक आयुक्त श्री. राजू वाकुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलत्या रोजगार बाजारपेठेच्या गरजा ओळखून तरुणांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. त्यांनी शासनाच्या विविध कौशल्य विकास व उद्योजकता योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी श्री. भुजंग रिठे आणि श्री. सुरेश बहुरे यांनीही उमेदवारांना या सुवर्णसंधीचा उपयोग करून स्वतःची प्रगती साधण्याबाबत प्रोत्साहित केले.

मेळाव्यास ५४७ इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहून आपली नोंदणी केली होती. विविध आस्थापनांकडे एकूण ७६६ मुलाखती पार घेण्यात आल्या.मुलाखतीअंती २०७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199